# जाहिर सुचना

**वाचा :-** १) शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.टिपीएस-१८१२/१५७/सिआर-७१/१२/पुर्न:क्र३४/१२ /आरडि/नवि-१३,दिनांक २१/११/२०१३
२) शासन ग्राम विकास विभाग निर्णय क्र.व्हिपीएम-२०१५/प्र.क.३९/पं.रा-४,दि.११/१२/२०१५

वर्धा शहरालगतचे हद्दीकरीता तयार करण्यात आलेल्या परीसर विकास योजनेतील ११ गांवाचे मौजा सावंगी(मेघे), सिंदी(मेघे), पिपरी(मेघे), बोरगाव(मेघे), नालवाडी, म्हसाळा,उमरी (मेघे),चिंचाळा,चितोडा, आलोडी ,दत्तपुर तसेच वर्धा जिल्हयातील ग्रामीन क्षेत्रातील विविध प्रयोजनार्थ अकृषक करावयाचे अभिन्यास नकाशे व मंजूर अभिन्यासातील भुखंडावरील बांधकाम नकाशे नगर रचनाकार, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, शाखा कार्यालय वर्धा यांचेकडे अभिप्रायार्थ/मंजुरीस्तव संबंधित यंत्रनेमार्फत/ प्राधिकरणामार्फत पाठविल्या जातात.अश्या प्रकरणांमध्ये बांधकाम नकाशे/अभिन्यास नकाशे हे यथोचित मान्यताप्राप्त/परवानाधारक वास्तुविशारद/अभियंता/आरेखक यांचे सहि, शिक्क्यानिशी व आवश्यक त्या प्रमाणपत्रासह नगर रचना कार्यालयात सादर होणे आवश्यक आहे.

यास्तव उपरोल्लेखीत क्षेत्राकरीता शासनाने लागू केलेल्या प्रमाणित बांधकाम विकास नियत्रंण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.३ व ६.४ चे तरतुदीनुसार पात्र असलेल्या वास्तुविशारद व स्थापत्य अभियंता यांनी नगर रचना विभागाकडून परवाना/अनुज्ञप्ती प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेस्तव आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी अर्ज (दोन पासपोर्ट साईज फोटो, पदविका/पदवी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र ईत्यादी) नगर रचनाकार, शाखा कार्यालय, जिल्हा क्रिडा संकुल डॉ. आंबेडकर चौक वर्धा यांचे कडून मागविण्यात येत आहे. पात्रताधारक वास्तुविशारद/अभियंता यांनी आवश्यक ती शासकीय फि अदा केल्यांनतर त्यांना या कार्यालयातर्फे अनुज्ञप्ती प्रमाणत्र यथाशिघ्र प्रदान करण्यात येईल.

दि.०१/०३/२०१६ पासुन या कार्यालयातर्फे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र प्रदान केलेल्या संवर्ग निहाय वास्तुविशारद/स्थापत्य अभिंयता/आरेखक यांचे कडील स्वाक्षी /शिक्का व आवश्यक ती प्रमाणीत प्रमाणपत्रे सादर करण्यात आलेल्या बांधकाम नकाशांना/अभिन्यास नकाशांना मंजुरीची शिफारस किंवा अंतीम मंजुरी प्रदान करण्यात येईल अन्यथा अशी प्रकरणे नामंजुर करण्यात येईल याची कृपया नोद घेण्यात यावी.

संबधित वास्तुविशारद/स्थापत्य अभिंयंता/आरेखक यांना अधिक विस्तृत माहिती आवश्यक असल्यास त्यांनी उपरोक्त कार्यालयात शासकिय कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष भेटण्याचे करावे.

दिनांक :-३१/१/२०१६

-स्वा-
(सु.व.देशमुख)
नगर रचनाकार
नगर रचना, शाखा कार्यालय,वर्धा